दै. तरुण भारत

२१।७।१४

# दोडामार्ग कॉलेजच्या 'आजीवन शिक्षण'चे उद्‌घाटन

**दोडामार्ग :** येथील लक्ष्मीबाई सीताराम हळबे महाविद्यालयात आजीवन शिक्षण व विस्तार विभागाचे उद्‌घाटन गवाणकर कॉलेजचे प्राचार्य यशोधन गवस, गवाणकर यांच्या हस्ते झाले. अन्नपूर्णा योजना व राष्ट्रीय मुक्त विद्यालय या दोन प्रकल्पाबद्दल विद्यार्थ्यांना वर्षभर करावयाच्या कामाचे मार्गदर्शन व भविष्यात काय केले पाहिजे, याची माहिती दिली. यावेळी प्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील, प्रा. डॉ. आर. एस. इंगळे, प्रा. एस. एस. पाडगावकर, डॉ. एस. यु. दरेकर उपस्थित होते. महाविद्यालयातून या विभागासाठी एकूण ६३ विद्यार्थी सहभागी झाले असून विद्यार्थी प्रतिनिधी म्हणून प्रशांत गवस व पूनम गवस यांची निवड करण्यात आली. सूत्रसंचालन राहुल पवार यांनी केले.